मुद्दा क्र. १२

कलम ४ (१)(ख)(XII)

मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे आदेश क्र.वैद्य/१३/कावि/६०९/२०२२ दिनांक २५/०७/२०२२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे एकूण ८ रुग्णालय व २९ दवाखान्यांमधुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील व हद्दीबाहेरील रुग्णांना उपचारार्थ आरोग्य सेवा सुविधा पुरविल्या जातात. सदरचे उपचारार्थ देण्यात येणा-या सेवा व ओषधोपचाराचे सध्या आकारणी करणेत येत असलेले दर सन २०११ पासून लागू करण्यात आलेले असून अद्यापपर्यंत सदर दरपत्रकानुसार आकारणी केली जात आहे.

महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व ओषधी द्रव्ये विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र वैशिवि-२०२१७/प्र.क.१९१/प्रशा/-२ दि २० नोव्हेंबर २०१७ नुसार राज्यातील शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयांशी सलग्नित रुग्णालयातील औषधोपचार तसचे निरनिराळया वैद्यकीय सुविधांसाठी आकारण्यात येणारे सुधारीत शुल्कास मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्य शासनाकडून आकारणेत येणारे दर व मनपाकडून आकराणेत येणारे दर यामध्ये तफावत राहू नये याकरीता राज्याशासनाचे रुग्णालय/दवाखाना करीता लागू असलेले दर मनपाचे रुग्णालयामार्फत देण्यात येणा-या वेगवेगळया सुविधा व औषधोपचाराकरीता लागू करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने सद्यस्थितीत मनपा मार्फत देणेत येणा-या निरनिराळया वैद्यकीय सुविधांसाठी आकरण्यात येणा-या दरामध्ये पिंपरी चिंचवड शहरात वास्तव्याचा पुरावा सादर न करणा-या रुग्णांकडून प्रत्येक वैद्यकीय शिर्षामध्ये आंतररुग्ण बिलामध्ये २० % जादा फी आकारण्याचे व ओपीडी रुग्णांचे बाबतीत वास्तव्याचा पुरावा आवश्यकता नसलेबाबत मनपाचे सध्याचे धोरण कायम ठेवून तसेच यापूर्वी मनपा मार्फत काढणेत आलेले आदेश क्र. वैद्य/२/कावि/४१६/२०१४, दिनांक २९/०४/२०१४ नुसार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत येणारे केशरी रेशनकार्डधारक नागरिक वगळुन इतर केशरी रेशनकार्डधारक नागरिकांना देणेत आलेली मोफत सुविधा आदेश निरस्त करणेत येवून शासन निर्णय क्र वैशिवि २०१७ /प्र.क्र १९१/प्रशा-२ दि २० नोव्हेबर २०१७ निर्णयानुसार निरधारीत केलेले शासरीय दर मनपाचे रुग्णालय/दवाखान्याकरीता लागू करणेस. मा.स्थायी समिती ठराव क्र ३९३ दि ५/०७/२०२२ व मा. महापालिका ठराव क्र १०८ दि ०५/०७/२०२२ अन्वये महापालिका महासभेने मान्यता दिलेली आहे.

मा. आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे आदेशान्वये दि १/०८/२०२२ पासून मा. स्थायी समिती व मा. महापालिका सभेने मान्यता दिल्याप्रमाणे रुग्ण सेवासुविधा पुर्वीच्या दरामध्ये बदल करुन शासन निर्णय क्र वैशिवि-२०१७/प्र.क१९१/प्रशा/-२ दि २० नोव्हेबर २०१७ नुसार निर्धारीत केलेले शासकीय दर मनपाचे रुग्णालय/दवाखान्याकरीता लागू करणेस मान्यता देत आहे. तरी दवाखाना/रुग्णालय प्रमुखांनी आपआपल्या दवाखाना/रुग्णालयामध्ये उपलब्ध असलेल्या सर्व सुविधा तपासणी/उपचारासाठी निर्धारीत केलेल शासकीय दरांची अंमलबजावणी करणेत येवून, सदर दर लागू करणेत यावेत.

रुग्णसेवेत अडथला येवू नये म्हणून खालील प्रमाणे नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहून कार्यवाही करण्यात यावी.

१) शासन निर्णयानुसार यापुर्वी दवाखाना / रुग्णालय प्रमुखांना फी सवलतीसाठी दिलेले अधिकार निरस्त करणेत आलेले नाहीत.

२) सदरची रुग्णसेवा शहरातील नागरिकांना मिळण्यास प्राधान्य देण्याच्या दृष्टीने वास्तव्याचा पुरावा म्हणून रेशनिंग कार्ड,लाईट बिल, ओळखपढ व तो नागरिक पिंपरी चिंचवड शहारातील रहवासी आहे त्याचे पुरावे घेवूनच रुग्णसेवा देणेत यावी. अपवादात्मक परिस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माननीय सदस्यांचे शिफारशीच्या आधारे रुग्णसेवा बिलामध्ये ५० % अथवा पुर्णत: रक्कम सवलत माफीचे अधिकार वैद्यकीय विभाग प्रमुखांना पूर्वीप्रमाणेच राहतील.

३) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत येणारे पिवळे/केशरी रेशनकार्डधारक नागरिक वगळून इतर केशरी रेशनकार्ड नागरिकांना देणेत आलेली मोफत सुविधा आदेश निरस्त करणेत येत आहे.

४) शासन निर्देशानुसार रुग्णालय/दवाखान्यामार्फत रुग्णांना देणेत येणा-या वैद्यकीय सेवेपैकी काही सेवा हया जनहिताच्या व राष्ट्रहिताच्या स्वरुपाच्या असल्यामुळे राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांतर्गत सर्व सेवा- कुटुंब नियोजन, माताबाल संगोपन, क्षयरोग (टी.बी.आणि बी.सी.जी.), अंधत्व नियंत्रण कार्यक्रम, मेडिको लिगल प्रकरणी ओषधोपचार, श्वान प्रतिबंधक उपाय योजना, सर्पदंश, विंचूदंश, वैगेरे, साथीच्या रोगावरील, कोविडचे रुग्ण तसेच आकस्मिक आपत्तीमधील उपचार सेवा रुग्णांना मोफत देण्यात याव्यात.

५) पिंपरी चिंचवड शहरात वास्तव्याचा पुरवा सादर न करणा-या रुग्णांकडून प्रत्येक वैद्यकीय शिर्षामध्ये आंतररुग्ण बिलामध्ये २० % जादा फी आकारण्यास मान्याता देणेत येत आहे. व ओ.पी.डी रुग्णांचे बाबतीत वास्तव्याचा पुरावा आवश्यक असणार नाही. मनपा हद्दीबाहेरील रुग्णांना फी माफी/सवलत किंवा इतर कसलीही सवलत देता येणार नाही.

६) मनपा अधिकारी/कर्मचारी व पालिकेचे आजी माजी नगरसदस्य व या सर्वांचे कुटुंब व्याख्येनुसार त्यांचेवर अवलंबून असणा-या व्यक्तींना मोफत सुविधा देणेत याव्यात.

७) शहरातील दारिद्रय रेषेखालील रुग्ण, आपत्कालीन स्थितीतील रुग्ण /भूकंप, पूरग्रस्त,बेवारस,वारकरी इ) जेष्ठ नागरिक, स्वातंञ्यसैनिक, सेवानिवृत्त कर्मचारी, पञकार, वाय.सी.एम.एच. येथे नियुक्तीस असणारे पोलीस कर्मचारी, मानधनावरील व अन्य प्रकारे काम करणारे कर्मचारी/अधिकारी ( घंटागाडी,अंगणवाडी,सी.पी.एस. कंञाटी अधिकारी/कर्मचारी व इंटरन डॉक्टर्स) यांना वैद्यकीय सेवा मोफत देणेत यावी.

८) मनपा हद्दीबाहेरील असले तरी दारिद्रय रेषेखालील रुग्ण,जेष्ठ नागरिक, स्वातंञ्यसैनिक यांना तसा पुरावा सादर केलेनंतर ओषधोपचार, रुग्णसेवा मोफत देण्यात यावी.

सदर आदेशाची अमंलबजावणी दि १/०८/२०२२ पासुन करण्यात यावी.